I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

# प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S. (पोलीस ठाणे):** मोधा **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0555 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/09/2026 23:31 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** सोमवार **Date from (दिनांक पासून):** 21/09/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 21/09/2026

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 14:15 तास **Time To (वेळेपर्यंत):** 15:05 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 21/09/2026 **Time (वेळ):** 22:51 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 059 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 21/09/2026 22:51 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. (a) **Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 2 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भंडारी यांचे हाटेल मध्ये, वसमत रोड, बी रघुनाथ हालचे बाजुस ,परभणी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): किशोर यमाजी तरोणे

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1970

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, परभणी, परभणी, नानलपेठ, परभणी, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,, परभणी, परभणी, नानलपेठ, परभणी, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-8888896489

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | शेख वसीम शेख हारुन | | | 1. सरफराज नगर,परभणी,Town/Village (शहर / गाव): परभणी,Tehsil (तहसील): परभणी,Police Station (पोलीस ठाणे): नानलपेठ,District (जिल्हा): परभणी,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5,000/रु 500 रुपये दराच्या 10 नोटा | 5,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 5,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

मी किशोर यमाजी तरोणे वय56वर्ष, पो. उप अधी., ला. प्र. वि., परभणी
सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो कि, मी दि28/8/26 पासुन ला. प्र. वि. परभणी येथे पोलीस उप अधीक्षक म्हणुन कार्यरत आहे.

मुळ तक्रारदार काशिनाथ भागोजी मोरे वय68वर्ष व्यव-शेती रा.चिंचोली काळे ता. जिंतूर यांनी दि15/9/26 रोजी ला. प्र. वि. परभणी येथे लेखी तक्रार दिली की, "माझा तुळशीदास ठोंबरे रा.निवळी खु ता.जिंतूर यांचे सोबत निवळी खु येथील शेतजमीनीचा वाद आहे. त्यासाठी दिवाणी दावा जिंतूर कोर्टात दाखल केला आहे. परंतु तुळशीदास ठोंबरे यांनी माझे व इतर 5 जणांविरुध्द बोरी पोलीस स्टेशनला खोटा गुन्हा नोंद केला आहे. आमचे विरुध्द पोलीस स्टेशन बोरी येथे एफआयआर क्र 208/26 प्रमाणे गुन्हा दाखल आहे. मी गुन्हयात अटकपुर्व जामीन मिळण्यासाठी परभणी जिल्हा कोर्टात वकीलामार्फत अर्ज करुन जामीन मंजुर करुन घेतला. जामीन मंजुर झाल्याने दि8/9/26 रोजी गजानन ठोबंरे व मी बोरी येथे जावुन' तपासी अधिकारी वसीम शेख यांची भेट घेतली. त्यावेळी तपासी अधिकारी वसीम शेख यांनी पुढील जामीन घ्यायची असेल तर 5000/-रु द्यावे लागतील असे म्हणाले. अटकपुर्व जामीन आदेशामध्ये जामीन बंधपत्र लिहुन घेण्याचे नमुद आहे. त्यामुळे बंधपत्र लिहुन घेण्यासाठी पैसे देण्याची आवश्यकता नाही. तपासी अधिकारी वसीम शेख हे मागत असलेले 5000/-रु हि लाच आहे. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही.माझे त्यांच्याशी कोणतेही भांडण-तंटा, वाद अथवा दुष्मनी नाही. तसेच कोणत्याही प्रकारचे देण्याघेण्याचे आर्थिक व्यवहार नाही. मी आज दि15/9/26 रोजी तपासी अधिकारी वसीम शेख यांची भेट घेणार आहे. त्यावेळी त्यांनी किंवा त्यांचे वतीने इतर कोणी मला लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी हि विनंती." वगैरे हस्तलिखीत तक्रार तक्रारदार यांनी दिली आहे. त्यावरून आम्ही तात्काळ नगर भुमापन अधिकारी, परभणी यांचेकडुन दोन शासकीय पंच नामे 1) श्री. सुजितकुमार राजकुमार मेहेत्रे वय46वर्ष परिरक्षण भुमापक क्र 4 व 2) श्री महेश गंगाधर जोंधळे वय19वर्ष शिपाई कंत्राटी यांना उपलब्ध करून घेतले. दोन्ही पंचांची व तक्रारदाराची ओळख करून दिली. तक्रारदाराने पंचाना तक्रारीबाबत तोंडी माहिती दिली. तसेच तक्रारदाराची हस्तलीखीत तक्रार त्यांना वाचावयास दिली. तक्रारीबाबत खात्री झाल्याने आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यानंतर तक्रारदार यांना लोकसेवक शेख वसीम हे कोठे भेटतील याबाबत विचारपुस केली. तेंव्हा तक्रारदार यांनी लोकसेवक शेख वसीम हे पोलीस स्टेशन, बोरी येथे भेटतील असे सांगितले. त्यामुळे तक्रारदार यांना बोरीकडे पाठवुन त्यांचे पाठोपाठ आम्ही, दोन्ही पंच व संपुर्ण सापळा पथक असे संपुर्ण किट साहित्यासह मोटार सायकलने रवाना झालो. बोरी शहराच्या अलीकडे एका शेतात आडोशाचे ठिकाणी तक्रारदार थांबल्याने त्यांचेकडे गेलोत. सदर ठिकाणी पडताळणी पुर्व कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक शेख वसीम हे परभणी येथे गेले आहेत. त्यांची आज भेट होवु शकणार नसुन दि16/9/26 रोजी पडताळणी कार्यवाही करण्याची विनंती केली.त्यानंतर दि16/9/26 रोजी 10.40 ते 14.00 वाजण्याच्या दरम्यान तक्रारदार व पंच मेहेत्रे यांना योग्य त्या सुचना देवुन पोलीस स्टेशन बोरी येथे पाठवुन लाचमागणी पडताळणी कार्यवाही करण्यात आली. सदर लाचमागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेल्या घटनेबाबत तक्रारदार व पंच मेहेत्रे यांना विचारपुस केली. तसेच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर च्या सहाय्याने मेमरी कार्डमध्ये ध्वनिमुद्रीत केलेल्या फाईल क्र 1040 मधील संभाषण ऐकले. त्यावरुन पोलीस स्टेशन बोरी येथे तक्रारदार व पंच मेहेत्रे यांची तपासी अधिकारी शेख वसीम व तेथे हजर असलेल्या एका अधिकारी सोबत चर्चा झाली. सदर भेटी दरम्यान तपासी अधिकारी शेख वसीम यांनी कोर्टाचे आदेशाप्रमाणे कागदपत्रे घेवुन तक्रारदार यांना जामीन करून दिली. तसेच पंच मेहेत्रे यांचे साक्षीदार म्हणुन नाव लिहुन घेवुन त्यांची सही घेतली. जामीनाचे

काम संपल्यानंतर तपासी अधिकारी शेख वसीम यांनी पंच मेहेत्रे यांना बाहेर जाण्यास सांगितले. काही वेळाने तपासी अधिकारी शेख वसीम यांनी तक्रारदार मोरे यांना गजानन ठोंबरे यांनी काही सांगितले का असे विचारले. परंतु गजानन ठोंबरे यांनी काही सांगितले नसल्याचे तक्रारदार यांनी सांगितले. त्यामुळे तपासी अधिकारी शेख वसीम यांनी "झाल्याच्यान साहेबाला काई कराव लागन" असे म्हणुन जामीनीचे काम झाल्यावर साहेबांचे नावाने पैसे द्यावे लागतील अशा प्रकारे तक्रारदार यांना इषा-यामध्ये बोलले. तसेच तक्रारदार यांना हजेरीला तुम्हाला सांगीतलेल हय... हजेरीला रोज यायच... कस करायच ते सांगा असे म्हणाले. त्यामुळे तक्रारदार यांनी विनंती केली. त्यावर तपासी अधिकारी शेख वसीम यांनी "ते हया बाबतीत काई कराव लागन नं" असे म्हणाले. त्यामुळे मी "किती कराव लागन" अशी विचारपुस केली. त्यावेळी तपासी अधिकारी शेख वसीम यांनी "साहेबाला सांगितल" असे म्हणुन मोबाईलवर 10,000/-रुपयाचा आकडा टाईप करुन इशा-यामध्ये तक्रारदार यांना 10,000/-रु लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी "दहा हजार रुपये लय व्हायलेत, चार-पाच हजार देतो, साहेबाला बोला न" असे म्हणुन रक्कम कमी करण्यास विनंती केली. त्यावर तपासी अधिकारी शेख वसीम यांनी होकार दर्शवुन तक्रारदार मोरे यांना साहेबाकडे घेवुन गेले. तेथे तपासी अधिकारी शेख वसीम यांनी त्यांचे साहेबांसोबत चर्चा केली. त्यादरम्यान साहेबांनी तक्रारदार यांना पैशाची मागणी केली नाही. परंतु बाहेर आल्यानंतर तपासी अधिकारी शेख वसीम यांनी तक्रारदार मोरे यांना "काय करुन घ्या म्हणता... दहा आम्हाला पहिलेच सांगितले होते" असे म्हणाले. सदर संभाषणावरुन तपासी अधिकारी शेख वसीम यांनी तक्रारदार मोरे यांना साहेबाला द्यावे लागतील असे म्हणुन मोबाईलवर आकडा टाईप करुन 10,000/-रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तक्रारदार यांचेकडे रक्कम नसल्याने रक्कम जमा झाल्यानंतर सापळा कार्यवाही करण्याची विनंती केली. त्यामुळे तक्रारदार यांचे विनंती प्रमाणे सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.दि20/9/26 रोजी तक्रारदार मोरे यांनी आम्हाला कॉल करुन लोकसेवक तपासी अधिकारी शेख वसीम यांचे विरुध्द दि21/9/26 रोजी सापळा कार्यवाही करण्याची विनंती केली. त्यामुळे नगर भुमापक अधिकारी, परभणी यांना पत्र देण्यात आले. नगर भुमापक अधिकारी, परभणी यांनी पंच मेहेत्रे यांचे नातेवाईक मयत झाल्याने मेहेत्रे ऐवजी श्री धोंडीबा जाधव यांना पंच म्हणुन पाठविले. त्यानंतर श्री धोंडीबा जाधव तक्रारीबाबत माहिती देवुन सापळा कार्यवाही बाबत सुचना देण्यात आल्या.त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे खाजगी वाहन क्र एमएच 24 बीएल 5013 व मोटारसायकलने सापळा कार्यवाही साठी लागणा-या संपुर्ण किट साहित्यासह बोरीकडे सकाळी 09::30 वाजता रवाना झालो. बोरी शहराचे अलीकडे एका शेतात आडोशाचे ठिकाणी पोहचलो. काही वेळाने तक्रारदार यांनी सांगितल्याप्रमाणे 10::30 वाजता पोहचले. त्यावेळी तक्रारदार यांनी पंचासमक्ष तपासी अधिकारी शेख वसीम यांनी एसपी ऑफीस, परभणी येथे बोलविले असल्याचे सांगितले. त्यामुळे आम्ही, तक्रारदार, पंच व सापळा पथक असे खाजगी वाहन व मोटारसायकलने परभणी कडे निघालो. परभणी येथे मा. न्यायालयाचे पार्किग येथे 12::45 वाजता पोहचलो. तेथे आमचे सुचनेप्रमाणे तक्रारदार हजर होते. त्यावेळी तक्रारदार मोरे यांनी त्यांचेकडे 5000/-रु असल्याचे सांगुन रक्कम जमा केली. सदर रकमेत 5,000/- रू ज्यात 500/- रु दराच्या 10 नोटा पंचासमक्ष हजर केल्या. सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार, पंचांना व सापळा पथकास प्रत्येकाच्या कामाबाबत आम्ही सुचना दिल्या. तसेच पोशि/नागरगोजे यांनी अँथ्रासिन पावडर व

अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्म व वापरा बाबत माहिती देवून त्याचे प्रात्यक्षीक करून दाखविण्यात आले. लाचेच्या रकमेस अॅन्थ्रासीन पावडर लावून ती रक्कम तक्रारदार मोरे यांच्याकडे देवून व्हाईस रेकाॅर्डरसह तक्रारदार मोरे व पंच जोंधळे यांना लोकसेवक तपासी अधिकारी शेख वसीम यांची भेट घेण्यासाठी एसपी आॅफीस, परभणी येथे पाठविण्यात आले. तेथे तक्रारदार मोरे व लोकसेवक तपासी अधिकारी शेख वसीम यांची पंच जोंधळे यांच्या समक्ष भेट झाली. भेटी दरम्यान लोकसेवक तपासी अधिकारी शेख वसीम यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय, परभणी येथे BNSSक129 (crpc क.107) प्रमाणे कार्यवाही केली. काही वेळाने तक्रारदार, पंच जोंधळे व लोकसेवक शेख वसीम असे बी. रघुनाथ हाॅल च्या पुर्वेस व गायकवाड यांचे कुशन वर्क्सचे पश्चिमेस असलेल्या वसमत रोडवरील भंडारी यांचे हाॅटेलवर गेले. सदर ठिकाणी तक्रारदार व लोकसेवक शेख वसीम यांच्यात चर्चा झाली. सदर चर्चेदरम्यान लोकसेवक शेख वसीम यांनी 5,000/-रु पंच जोंधळे यांचेसमक्ष लाचरक्कम स्विकारली. त्यानंतर तक्रारदार यांनी सापळा पथकास दिसेल अशा प्रकारे पुर्वनियोजीत इशारा केला. तो इशारा पाहून सापळा पथकाने लोकसेवक तपासी अधिकारी शेख वसीम यांना ताब्यात घेतले. सदर ठिकाणी आम्ही स्वतःची ओळख सांगुन लोकसेवक तपासी अधिकारी शेख वसीम यांना त्यांचे पुर्ण नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव शेख वसीम शेख हारुन वय 40 वर्ष पोह/1048 नेमणुक पोलीस स्टेशन बोरी ता. जिंतूर रा. सरफराज नगर, परभणी असे सांगितलेे. त्यानंतर लोकसेवक तपासी अधिकारी शेख वसीम यांना पंचासमक्ष लाचेच्या रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी ते त्यांच्या पॅन्टच्या पाठीमागील डावे बाजुच्या खिशामध्ये असल्याचे सांगीतले. त्यावरून पंच जोंधळे यांनी लोकसेवक शेख वसीम यांचे खिशात लाचेची रक्कम मिळुन आल्याने ती त्यांनी बाहेर काढली. सदर 5000/- रूपयांच्या नोटांवर, पॅन्टचे पाठिमागील डावे बाजुचे खिशावर व लोकसेवक शेख वसीम यांच्या दोन्ही हातावर पंचासमक्ष अॅल्ट्राव्हायलेट लॅम्पचा प्रकाश टाकला असता अॅथ्रासिन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर पंच जोंधळे यांनी लोकसेवक यांचेकडुन हस्तगत केलेली लाचरक्कम व सापळा पुर्व कार्यवाही दरम्यान पंच जाधव यांचेकडे देण्यात आलेल्या नोंटाचे नंबर असलेला कागद यांची आपसात पडताळणी केली. त्यावरुन लाचेची रक्कम असल्याची खात्री झाली आहे. सदरची लाच रक्कम पंचासमक्ष जप्त करण्यात आली आहे. तसेच पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार मोरे आणि लोकसेवक शेख वसीम यांचे दरम्यान झालेले संभाषण डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरव्दारे ध्वनिमुद्रित करण्यात आले आहे. ध्वनिमुद्रीत संभाषण असलेले मेमरीकार्ड पंचासमक्ष जप्त करण्यात आले आहे. तसेच लोकसेवक शेख वसीम यांचे अंगावरील पॅन्ट जप्त करण्यात आली आहे. तसा सापळा पंचनामा करण्यात आला आहे. दि15/9/26 रोजी तक्रारदार काशिनाथ मोरे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी येथे तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन दि16/9/26 रोजी 10.40 ते 14.00 वाजण्याच्या दरम्यान पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही वेळी पोलीस स्टेशन बोरी येथे लोकसेवक शेख वसीम यांनी तक्रारदार मोरे यांचे विरुध्द दाखल गुन्हयात मदत करण्यासाठी व जामीनासाठी "झाल्याच्यान साहेबाला काई कराव लागन" असे म्हणुन लाचेसंदर्भात चर्चा केली. त्यामुळे तक्रारदार यांनी लोकसेवक शेख वसीम यांना विनंती करुन किती कराव लागल असे म्हणाले. त्यावर लोकसेवक शेख वसीम यांनी "साहेबाला सांगितल" असे म्हणुन मोबाईलवर 10,000/-रुपयाचा आकडा टाईप करुन इशा-यामध्ये तक्रारदार यांना 10,000/-रु लाचेची मागणी केली. त्यामुळे तक्रारदार यांनी "दहा हजार

रुपये लय व्हायलेत, चार-पाच हजार देतो, साहेबाला बोला न" असे म्हणुन विनंती केली. त्यानंतर दि21/9/26 रोजी 14.15 ते 15.05 वाजण्याच्या दरम्यान वसमत रोड, बी. रघुनाथ हाॅलचे बाजुस असलेल्या भंडारी यांचे हाॅटेल मध्ये करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक शेख वसीम यांनी तक्रारदाराकडुन पंचासमक्ष 5,000/- रू लाचेची रक्कम स्वतः स्विकारली आहे. म्हणून माझी शेख वसीम शेख हारुन वय40वर्ष पोह/1048 नेमणुक पो स्टे बोरी ता. जिंतूर रा. सरफराज नगर, परभणी यांचे विरूध्द भ्रप्रअ 1988 चे क 7 अन्वये कायदेशीर फिर्याद आहे

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** ~~VISHWAJEET GANGADHAR KASLE~~ (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):** म.पो.नि. मनिषा पवार ला.प्र.वि. परभणी

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

Name (नाव): VISHWAJEET GANGADHAR KASLE

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):